**आंतरराष्ट्रीय बुद्धिमत्तामापन चाचणीत ६४ आदिवासी विद्यार्थी पात्र**

**राहूल गाडेकर, पुणे, ७ ऑक्टोबर** २००७, Loksatta Pune Information

बुद्धिमत्ता ही फक्त शहरी व उच्चभ्रू वर्गातील लोकांची मक्तेदारी नाही. तर शिक्षणाच्या मुख्य केंद्रापासून दूर असलेल्या दुर्गम भागातील मुलांमध्येही कुशाग्र बुद्धिमत्ता आहे. पुणे जिल्ह्यातील आदिवासी विद्यार्थ्यांनी हेच सिद्ध केले आहे. या विद्यार्थ्यांनी आपल्यातही आंतरराष्ट्रीय निकषांची बुद्धिमत्ता असल्याचे दाखवून दिले आहे.

'मेन्सा इंडिया' या संस्थेने घेतलेल्या आंतरराष्ट्रीय बुद्धिमत्तामापन चाचणीत प्रथमच ते ६४ आदिवासी विद्यार्थी पात्र ठरले आहेत. यात ५० मुले आणि १४ मुलींचा समावेश आहे. बुद्धिमत्ता मापन क्षेत्रात काम करणाऱ्या या संस्थेतर्फे पुणे जिल्ह्यातील चार तालुक्यांमधील १० ते १५ वर्षे या वयोगटातील सुमारे २२०० विद्यार्थ्यांची बुद्धिमत्ता मापन चाचणी घेण्यात आली होती. 'मेन्सा इंडिया' या संस्थेचे विश्वस्त डॉ. नारायण देसाई यांनी याबाबत माहिती दिली.

मेन्सा इंडिया ही संस्था मेन्सा इंटरनॅशनल या मुख्य आंतरराष्ट्रीय संस्थेचा भारतीय विभाग आहे. मेन्सा इंडिया या संस्थेतर्फे आदिवासी बुद्धिमत्ता संवर्धन कार्यक्रम राबविण्यात येत आहे.

या कार्यक्रमाच्या पहिल्या टप्प्यामध्ये पुणे जिल्ह्यातील जुन्नर, खेड, मावळ आणि आंबेगाव या तालुक्यातील १२ निवासी शाळांमधील सुमारे २२०० विद्यार्थ्यांची बुद्धिमत्ता मापन चाचणी घेण्यात आली.

ही चाचणी मेन्सा इंटरनॅशनल या संस्थेच्या आंतरराष्ट्रीय निकषांनुसार घेण्यात आली. यात पात्र ठरलेल्या ६४ आदिवासी विद्यार्थ्यांपैकी पन्नास विद्यार्थ्यांना आता संस्थेच्या आदिवासी बुद्धिमत्ता प्रकल्पात सहभागी करून घेण्यात येणार आहे. यात ४० मुले आणि १० मुलांचा समावेश आहे. मावळ तालुक्यातील कामशेत या गावाजवळील माऊलीनगर येथील निष्ठा केंद्र येथे हा प्रकल्प राबविण्यात येणार आहे.या विद्यार्थ्यांना प्रत्येक महिन्याला चार दिवसांसाठी या निष्ठा केंद्रात आणण्यात येईल.

येथे त्यांच्यातील नेतृत्वगुण, संज्ञापन कौशल्ये, अध्ययन कौशल्ये, क्रियाशीलता, स्मरणशक्ती, व्यक्तिमत्त्व विकास अशा प्रकारच्या विविध क्षमता व गुणांचा विकास करण्यासाठी उपक्रम राबविल जातील. यासाठी प्राचीन तसेच आधुनिक अशा शास्त्रीय अध्ययन पद्धतीचा समावेश असलेले अठरा मॉड्युल तयार करण्यात आले आहेत. यात अनेक मानसशास्त्रज्ञ पर्यावरणतज्ज्ञ तसेच शिक्षणतज्ज्ञांचा सहभाग असणार आहे.

विविध खेळ, कोडी, चित्रपट अशा प्रकारच्या मनोरंजनात्मक साधनांचा वापर यात करण्यात येणार आह. यासाठी निष्ठा केंद्रांमध्ये दृकश्राव्य सुविधा, अभ्यासासाठी, खेळण्यासाठी जागा, ध्यानकक्ष, सुसज्ज माहिती केंद्र अशा सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.

या केंद्राचे उद्घाटन मंगळवार, दि. ९ ऑक्टोबर रोजी कामशेत येथील माऊलीनगर मधील निष्ठा केंद्र येथे होणार आहे. राज्य शासनाच्या विभागीय आदिवासी विकास केंद्राचे प्रकल्प संचालक कापसे, मेन्सा इंडिया या संस्थेचे अध्यक्ष डॉ. गिरीश बापट, सेवाधान ट्रस्टचे कार्यकारी विश्वस्त, डॉ. एस. व्ही. गोरे या वेळी उपस्थित राहणार आहेत.

या विद्यार्थ्यांमधील गुणांचा विकास करून त्यांच्यातूनच सामाजिक नेतृत्व तयार करणे हा या प्रकल्पाचा उद्देश आहे. या सामाजिक नेतृत्वाचा वापर करून समाज विकासाच्या अनेक योजना समाजाच्या खालच्या स्तरापर्यंत राबविता येऊ शकतील, असा दूरदृष्टिकोन यामागे आहे, असे या प्रकल्पाचे प्रमुख डॉ. नारायण देसाई यांनी सांगितले.

या प्रकल्पासाठी राज्य शासनाच्या विभागीय आदिवासी विकास केंद्राचे प्रकल्प संचालक श्री. कापसे, सेवाधाम ट्रस्ट, दिशा फाउंडेशन, नाईटिंगल चॅरिटेबल ट्रस्ट याची मोलाची मदत झाल्याचे देसाई यांनी सांगितले.

आदिवासी बुद्धिमत्ता संवर्धन कार्यक्रमाच्या माध्यमातून आदिवासी मुलांमधील उपजत नैसर्गिक गुणांचा विकास करण्याचा प्रयत्न करण्यात येईल. विद्यार्थ्यांनाही स्वत:मधील विविध क्षमता ओळखून त्यांचा विकास साधण्यास मदत होईल, असे या प्रकल्पाच्या सदस्या बुद्धिमत्तामापन चाचणी समन्वयक शशी सरवदे यांनी सांगितले.

मेन्सा इंडियातर्फे या विद्यार्थ्यांबरोबरच शिक्षक व पालकांसाठीही प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्यात यणार आहे. या सर्व उपक्रमांच्या परिणामांचे वेळोवेळी मूल्यमापन करण्यात येणार आहे. या संस्थेविषयी अधिक माहिती www.tribalmensa.blogspot.com या संकेस्थळावर पाहायला मिळू शकेल.

देशाच्या आदिवासी भागातही आंतरराष्ट्रीय दर्जाची गुणवत्ता असणारे विद्यार्थी आहेत. या विद्यार्थ्यांच्या क्षमतांचा योग्य साधनांद्वारे विकास केल्यास देशाच्या व समाजाच्या विकासात ते निश्चितच मोलाचे योगदान देऊ शकतील. त्यासाठा त्यांना फक्त प्रोत्साहन देण्याची गरज आहे.हेच या उदाहरणावरून दिसून येते.

**माहितीचा साठा**

मेन्सा इंडिया या संस्थेने एकूण २२०० विद्यार्थ्यांची गुणवत्तामापन चाचणी घेतली होती. त्यातील ६५ पात्र विद्यार्थ्यांपैकी फक्त ५० विद्यार्थ्यांनाच या प्रकल्पात सहभागी होता येणार आहे. परंतु या चाचणीच्या निमित्ताने या सर्व विद्यार्थ्यांची गुणवत्ताविषयक माहिती संस्थेकडे जमा झाली आहे. या माहितीचा उपयोग करून या उर्वरित सर्व विद्यार्थ्यांच्या कमतरता व आवडीचे विषय जाणून घेऊन त्यांच्या क्षमतांचा विकास करणे शक्य होणार आहे. परंतु संस्थेकडे निधीची कमतरता असल्याने इतर कोणत्याही सामाजिक संस्थेने यासाठी पुढाकार घेतल्यास त्यांना ही माहिती मोफत पुरविण्यात यईल, असे डॉ. देसाई यांनी सांगितले.